


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड - महाराष्ट्र । गुरूवार दि. ०७ मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक ४८ । पाने ४ । पान १ । किंमत ३ रुपये




RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com







# 'ममता बॅनर्जींनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला नाही तर...'



## 'दूधखुळ्या' म्हणत उज्वल निकमांनी झापलं

**वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल हा जनादेश नसून कारस्थान आहे, असं पश्चिम बंगालच्या मावळत्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींनी मंगळवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये म्हटलं. ममता यांनी निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करताना मी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार नाही असं ममता बॅनर्जींनी म्हटलं आहे. १७ व्या बंगाल विधानसभेचा कार्यकाळ गुरुवार, ७ मे २०२६ रोजी संपुष्टात येत आहे. त्यानंतर ममता बॅनर्जी यांना अधिकृतपणे मुख्यमंत्री मानलेच जाणार नाही. घटनेनुसार ममता बॅनर्जी यांचा ५ वर्षांचा कार्यकाळ संपला असून सध्या त्या राज्यपालांच्याच सल्ल्याने काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत. निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमध्ये नवीन विधानसभांची रचना करण्याबाबतची अधिसूचना राज्यपालांकडे पाठवली आहे. मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा न देण्याची ताठर भूमिका घेणाऱ्या ममता बॅनर्जींना भाजपचे खासदार तसेच राज्याचे विशेष सरकारी अ‍ॅड. उज्वल निकम यांनी खडे बोल सुनावले आहेत.

### ● कायदा न समजण्याइतपत त्या...



**ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्यास नकार देणं हास्यास्पद असून अशा पद्धतीचे वक्तव्य करून ममता बॅनर्जी काय साध्य करू इच्छितात ? असा सवाल भाजपचे खासदार तसेच राज्याचे विशेष सरकारी अ‍ॅड. उज्वल निकम यांनी उपस्थित केला आहे. असे वक्तव्य म्हणजे निवडणुकीत पक्षाचा मोठा पराभव झाल्यामुळे कदाचित ममता बॅनर्जी यांच्या यांच्या मानसिकतेवर परिणाम झाला असावा. अशा पद्धतीचे वक्तव्य करून ममता बॅनर्जी यांचा एवढाच उद्देश दिसतो आहे की आपला कार्यकर्त्यांना पुन्हा गुंडागर्दीकडे वळवायचं, असा टोला उज्वल निकम यांनी लगावला. कायदा न समजण्याइतपत त्या दूधखुळ्या नाहीत. ममता बॅनर्जी यांना आपण काय बरगळलो याची जाणीव होईल. लवकरच त्यांचे सल्लागार त्यांना चांगला सल्ला देतील, अशी अपेक्षा उज्वल निकम यांनी व्यक्त केली.**

### ▸ ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला नाही तर

निवडणुकीत एखाद्या पक्षाचा पूर्णपणे पराभव झाला असताना देखील मुख्यमंत्र्यांनी राजीनामा देण्यास नकार देण्याची भारताच्या इतिहासातली ही पहिलीच घटना आहे, असंही निकम यांनी आवर्जून नमूद ▶▶ उर्वरित पान २ वर

# गोठ्याला लागली भीषण आग, वृद्ध वडिलांचा होरपळून मृत्यू

## १० गायी, १५ शेळ्या आणि १५० जळून कोळसा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना घडली आहे. धारूर तालुक्यातील रेपेवाडी येथे रात्री शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत एका वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या आगीमध्ये १५ गायी, १५ शेळ्या आणि १५० कोंबड्या जळून खाक झाल्या आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या



माहितीनुसार, धारूर तालुक्यातील ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'कौटुंबिक भांडण ठरले जीवघेणे !'

## टिप्पर चालकाचा काठीने मारहाण करुन खून

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील सुर्डी येथील ग्रामपंचायत सेवक मंगेश भरत माने (वय ३२) याने गावातीलच टिप्पर चालक खुशालराम बलभीम ठोंबरे (वय ५५) यांचा काठीने बेदम मारहाण करून खून केला. ही घटना मंगळवारी दुपारी मांगवडगाव शिवारातील सुर्डी फाटा येथील एका हॉटेलमध्ये घडली.

**भांडणाची कुरापत अन् जीवघेणा हल्ला-** मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी त्यांच्या




कुटुंबात झालेल्या भांडणाची कुरापत काढून मंगेश माने याने खुशालराम ठोंबरे यांना लाकडी काठीने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाण इतकी भीषण होती की ठोंबरे हे जागीच बेशुद्ध पडले. त्यांना तातडीने धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तेथे पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले.

**पोलीस कारवाई आणि अंत्यसंस्कार-** मयत खुशालराम ठोंबरे यांचा मुलगा बालाजी ठोंबरे याने दिलेल्या फिर्यादीवरून युसूफवडगाव पोलीस ठाण्यात मंगळवारी रात्री आरोपी मंगेश माने विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुधवारी दुपारी सुर्डी येथे मयतावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांनी या प्रकरणाचा पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

# हुंड्यासाठी महिला डॉक्टरचा छळ, सासरच्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नवी मुंबईत फ्लॅट घेण्यासाठी माहेरहून १२ लाख रुपये आणावेत, या मागणीसाठी सासरच्यांकडून होणाऱ्या सततच्या छळाला कंटाळून डॉ. गौरी सुनील चौरे (दळवी) या २६ वर्षीय महिला डॉक्टरने २ मे २०२६ रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथे गळफास घेऊन आत्महत्या केली. नोव्हेंबर २०२४ मध्ये डॉ. गौरी यांचा विवाह अमित बाबासाहेब दळवी ▶▶ उर्वरित पान २ वर

# मृत्यूनंतरही नराधमाने चिमुकलीला सोडलं नाही!

## प्राथमिक PM रिपोर्टमधून हादरवणारी माहिती समोर

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील नसरापूर अत्याचार प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असताना आता या प्रकरणातून धक्कादायक माहिती उघड होत आहेत. ६५ वर्षाच्या भीमराव कांबेळे या नराधमाने तोंड दाबून साडेतीन वर्षाच्या चिमुकलीचा अमानुष अत्याचार केला होता. ज्या गोठ्यात तो गेली काही महिने राहत होता. तिथंच त्याने चिमुकलीला नरकयातना दिसल्या.



अशातच आता ससून रुग्णालयाने ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये दुचाकीला कंटेनरची धडक

## लग्नाच्या खरेदीसाठी आलेल्या महिलेचा मृत्यू; चिमुकलीही जखमी





**बीड । प्रतिनिधी**

सध्या लगीनसराईला सुरुवात झाली असून ज्यांची घरी लग्न आहे, त्यांच्या घरी लगीन घाई पाहायला मिळत आहे. बाजारातून जाऊन खरेदीसाठी पाहुण्यांसह कुटुंबीयही गुंतलं आहे. एकीकडे घरात लग्नसराईचा आनंद असताना बीडमध्ये कुटुंबातील महिलेचा अपघाती मृत्यू झाल्याची दु:खद घटना घडली आहे.

लग्नाच्या खरेदीसाठी बाजारपेठेत दुचाकीवरून जात असताना कंटेनरने चिरडल्याने अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेनंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत संताप व्यक्त केला. तसेच, वाहनचालकास पोलिसांच्या ताब्यातही देण्यात आलंय. बीड शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकात ही घटना घडलीय. कंटेनर चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. या अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी चालकाला चोप देत पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. प्रतिभा चौधरी असे मृत महिलेचे नाव असून त्या लग्नाच्या खरेदीसाठी सुभाष रोड येथील बाजारपेठेत चालल्या होत्या. याच दरम्यान दुचाकीवरून रस्ता ओलांडत असताना कंटेनर चालकाला अंदाज आला नाही. त्यामुळे, दुचाकी कंटेनरच्या टायरखाली आल्यानं प्रतिभा चौधरी यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. सुदैवाने या अपघातात दुचाकीवरील चिमुकली बचावली आहे. मात्र, ती देखील जखमी झाली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून कंटेनर चालकावर पोलिसांकडून कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

### भरधाव कार लोखंडी अँगलला धडकली एक ठार, दोघे बचावले



**बीड । प्रतिनिधी**

स्टेअरींगवरील ताबा सुटल्याने भरधाव कार रस्त्यालगत असलेल्या लोखंडी अँगलला धडकल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला असुन एअरबॅग उघडल्याने दोघेजण बचावले आहेत. हा अपघात काल रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास बीड- गेवराई रोडवरील रामनगर परिसरात घडला. बीड तालु३यातील पेंडगावकडून बीडकडे येत असलेल्या कार ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड नवनाथ डोईफोडे यांच्या घराच्या वास्तुशांती निमित्त शुभेच्छा देताना दैनिक मराठा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे शत्रगुण डोईफोडे सर आधी छायाचित्र दिसत आहेत. छाया उमेश भोसले*



# निवडणूक निकालाचा मतीतार्थ !

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी हिंदूंना काही प्रमाणात आश्वस्त केले आहे ; मात्र तमिळनाडू आणि केरळम् येथील निकाल पहाता हिंदूंना प्रदीर्घ लढाईची सिद्धता करावी लागणार, हेही तितकेच खरे !

निवडणूक जरी ५ राज्यांत झाली असली, तरी सर्वांचे लक्ष बंगालच्या निवडणूक निकालाकडे लागले होते. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. 'त्यांची एकाधिकारशाही आणि मुसलमान तुष्टीकरणाचे राजकारण यांमुळे त्रस्त झालेले राज्यातील हिंदू सत्तांतर करतील कि पुन्हा ममताबानोंना सत्तेत बसवतील ?', याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. बंगालमध्ये निवडणुकीच्या दोन्ही टप्प्यांमध्ये ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाले. तेथील हिंदूंना परिवर्तन हवे होते. तृणमूल काँग्रेसच्या गुंडांनी अनेक ठिकाणी हिंसाचार केला ; मात्र मतदारांनी मतदानाद्वारे ममता बॅनर्जी यांच्या विरोधात असलेल्या रोषाला वाट मोकळी करून दिली. मतदानोत्तर चाचण्यांच्या निकालातूनही बंगालमध्ये सत्तांतर होणार, हे निश्चित झाले होते. बंगालमधील विजय हा भाजपचा आहेच ; मात्र त्यासह तो तेथील हिंदूंचाही आहे. सातत्याने हिंदूंची हेळसांड करणार्या ममताबानो यांचे राजकीय अस्तित्व हिंदूंनी मतपेटीद्वारे संपवले. त्यामुळे हा विजय हिंदूंसाठी विशेष आहे. जे बंगालचे, तेच आसामचे ! आसाममध्ये हिमंत बिस्व सरमा पुन्हा बाजी मारणार, हे सर्वज्ञात होते ; कारण वर्ष २०२१ पासून त्यांनी ज्याप्रमाणे राज्यामध्ये हिंदुत्वाचा झंझावात आणला, तो पहाता तेथील हिंदू त्यांना विजयाची चव चाखू देणार, हे उघड गुपित होते. सरमा यांनी 'ओठात एक आणि पोटात एक' असले राजकारण केले नाही. हिंदुत्वाविषयी त्यांची भूमिका सुस्पष्ट होती. 'राज्यातील मुसलमान भाजपला मतदान करणार नाहीत', असे ते उघडपणे सांगत. असे असतांना त्यांनी इतर राजकारण्यांप्रमाणे मुसलमानांना त्यांच्याकडे वळवण्याचा प्रयत्न न करता हिंदूंना स्वतःच्या बाजूने करण्याचा प्रयत्न केला आणि ते यशस्वीही झाले. या निवडणुकीत भाजप मागील निवडणुकीपेक्षा अंदाजे २५ जागा अधिक जिंकला आहे. साधारणतः निवडणुकीत सत्ताधारी पक्षाच्या जागा अल्प होतांना दिसतात. आसाममध्ये मात्र भाजपने त्याचे स्थान भक्कम केले आहे. या दोन्ही राज्यांसह पुद्दूचेरीमध्येही भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी पुन्हा सत्तेत येण्याची चिन्हे आहेत. एकीकडे हिंदू उत्साही असतांना तमिळनाडू आणि केरळम् येथील निकाल हे राष्ट्रप्रेमींना चिंता करायला लावणारे आहेत. तमिळनाडूमध्ये प्रथमच निवडणूक लढवणारे अभिनेते जोसेफ विजय यांचा तमिळगा वेत्तरी कळघम् (टीव्हीके) पक्ष सत्तेची चव चाखणार आहे, तर केरळम्मध्ये साम्यवाद्यांना नाकारून तेथील जनतेने काँग्रेसप्रणीत युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटला सत्तेत बसवले आहे. गेली काही वर्षे भाजप दक्षिणेत पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहे ; मात्र त्यात त्याला यश मिळालेले नाही. तमिळनाडू आणि केरळम् या राज्यांमधील निकालानंतर भाजपने चिंतन करणे अपरिहार्य आहे.




तमिळनाडूचे राजकारण हे द्रमुक आणि अण्णाद्रमुक पक्ष यांच्याभोवतीच फिरत असते. दोन्ही पक्षांनी आलटून पालटून सत्तेची चव चाखली आहे. जो पक्ष तमिळी अस्मिता, संस्कृती आणि भाषा यांविषयी मोठमोठ्या घोषणा किंवा भाषणे करतो, त्या पक्षाच्या पारड्यात तमिळी लोकांची मते पडतात. दोन्ही पक्षांतील नेते भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत. या दोन्ही पक्षांना भाजप हा कधीच पर्याय ठरला नाही ; कारण तो 'बाहेर'चा पक्ष होता. अशा स्थितीत तमिळी अभिनेते जोसेफ विजय यांनी वर्ष २०२४ मध्ये स्थापन केलेला पक्ष तमिळी जनतेने द्रमुकला पर्याय म्हणून निवडला. तसे पाहिल्यास तमिळी अभिनेत्यांनी राजकारणात उतरणे, हे राज्याच्या जनतेसाठी नवीन नाही. याआधी एम्.जी. रामचंद्रन् (एम्.जी.आर्.) आणि जयललिता यांनी राजकारण गाजवले आहे ; मात्र राजकारणात आल्यावर काही काळाने ते सत्ताधीश झाले. विजय यांना पक्ष स्थापन करून २ वर्षे झाली आहेत. त्यामुळे त्यांच्या गाठीशी राजकारणाचा किंवा सरकार चालवण्याचा अनुभव नाही. त्यांच्या पक्षाने प्रथमच निवडणूक लढवली आणि त्यांच्या पक्षाला सत्तेत बहुमतासाठी ८ ते १० जागा अल्प पडत आहेत. सध्या तरी तमिळनाडूचे पुढील मुख्यमंत्री म्हणून विजय यांच्याकडे पाहिले जात आहे. जे तमिळनाडूच्या दिग्गज राजकारण्यांना जमले नाही, ते विजय यांनी करून दाखवले. सनातन धर्माला नष्ट करण्याची भाषा मुख्यमंत्री एम्.के. स्टॅलिन यांचे पुत्र आणि उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी केली होती. त्यानंतर वारंवार द्रमुकवाल्यांनी हिंदूंच्या धर्मभावना दुखावल्या. त्यामुळे या पक्षाला अद्दल घडवणे अपरिहार्य होते. द्रमुकवाले सत्ताच्युत झाले ; मात्र त्याला सत्ताच्युत करतांना तेथील लोकांनी अण्णाद्रमुक किंवा भाजप यांना पर्याय म्हणून न निवडता एकदम नवख्या पक्षावर विश्वास ठेवला. विजय यांनी नागरिकत्व सुधारणा कायद्याला विरोध केला होता. 'पक्ष निधर्मी तत्त्वांवर चालणार', हे त्यांनी घोषित केले आहे. त्यामुळे या पक्षाची धोरणे आणि राज्याचा कारभार चालवण्याची पद्धत कशी असेल, हे येणारा काळच सांगेल. देहलीमध्ये अरविंद केजरीवाल यांना राजकारणाचा अनुभव नव्हता ; मात्र लोकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला. काही वर्षांनी भ्रष्टाचारात बरबटलेल्या केजरीवाल यांच्या पक्षाने लोकांचा विश्वासघात केला. तमिळनाडूमध्येही असेच होईल का ?

केरळम्मध्ये माकपचे पिनराई विजयन् यांच्या पक्षाला नाकारून तेथील लोकांनी काँग्रेसप्रणीत युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटच्या हाती सत्तेची सूत्रे सोपवली आहेत. साम्यवादी किंवा काँग्रेस हे एकाच माळेचे मणी आहेत. त्यामुळे केरळम्ची परिस्थिती पालटेल, अशी चिन्हे नाहीत. जिहादी आणि राष्ट्रघातकी घटकांमुळे तेथे हिंदुविरोधी अन् राष्ट्रघातकी कारवायांना ऊत आला आहे. काँग्रेस सत्तेत आल्यास ही परिस्थिती पालटणार नाही. येणार्या काळात साम्यवादी गुंड, जिहादी आणि धर्मांध यांचा राज्यात उच्छाद वाढून हिंदूंवर अत्याचारांचे प्रमाण वाढल्यास आश्चर्य वाटणार नाही. तमिळनाडू किंवा केरळम् या राज्यांतील जनतेवर गेली कित्येक वर्षे पुरोगामी, हिंदुद्वेषी आणि साम्यवादी यांच्या विचारांचा पगडा आहे. त्यामुळे येथे सकारात्मक परिवर्तन हवे असल्यास कित्येक वर्षे तेथील जनतेची वैचारिक मशागत करणे आवश्यक आहे. हे पुष्कळ प्रदीर्घ आणि चिकाटीने करण्याची प्रक्रिया आहे. त्यांची फळे आणखी १० ते १२ वर्षांनी दिसून येतील. ही राज्ये भगवी करायची असल्यास तेथे संयमाने कार्य करण्याची सिद्धता भाजपने किंवा अन्य कोणत्याही हिंदुत्वनिष्ठ पक्षाने दाखवली पाहिजे. त्यासाठी हिंदुत्वनिष्ठ पक्ष सिद्ध आहेत का ?

## आई....



**दगडांच्या खाणीत कष्ट उपसले, पण मुलीचं नशीब उजळलं! ४५ डिग्री उन्हात राबणाऱ्या आईच्या लेकीची उत्तुंग भरारी! ( परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द आणि आईच्या कष्टाची साथ असेल तर आभाळालाही गवसणी घालता येते, हे या लेकीने सिद्ध करून दाखवलं आहे. अंगाची लाहीलाही करणाऱ्या ४५ डिग्रीच्या कडक उन्हात, हातातील हातोड्याने दगड फोडत एका माऊलीने आपल्या मुलीच्या शिक्षणाची फी भरली... आणि आज त्या कष्टाचं सोनं झालंय!**

**९८.४% गुण मिळवून जिल्ह्यात प्रथम!**

**दगडांच्या खाणीत काम करणाऱ्या या मजुराच्या मुलीने १२वी सायन्सच्या परीक्षेत ९८.४% गुण मिळवून संपूर्ण जिल्ह्यात अव्वल येण्याचा मान मिळवला आहे. ज्या हातांनी दगड फोडले, त्याच हातांनी आज यशाची मोठी भिंत उभी केली आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, एका मजुराची मुलगी असल्यामुळे या यशाचे कौतुक करायला गर्दी जमली नाही. मजूर आईच्या कष्टाला सलाम! ही आई फक्त दगड फोडत नव्हती, तर ती आपल्या मुलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी रस्ता बनवत होती. समाजातील बड्या लोकांच्या मुलांच्या यशाची चर्चा होते, पण अशा खऱ्या हिऱ्यांकडे दुर्लक्ष होतं. या आईच्या कष्टासाठी आणि मुलीच्या जिद्दीसाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन त्यांचे अभिनंदन करायला हवे!**

**यशाचा खरा अर्थ ! परिस्थितीवर रडण्यापेक्षा, परिस्थितीला बदलण्याची ताकद शिक्षणात असते, हे या निकालाने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. या मुलीचे यश हे केवळ तिचे नसून, रक्ताचे पाणी करून मुलांना शिकवणाऱ्या प्रत्येक आई-वडिलांचा विजय आहे! या कष्टकरी आईसाठी......**

◆ पान १ वरून पुढे...

## 'ममता बॅनर्जींनी....

केलं. पराभवानंतर निवडणुकीतला निकाल मान्य नसेल तर आपल्या घटनेत अनेक कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत. स्वतःला प्रतिभाषाली समजणाऱ्या ममता दीदी यांनी राजीनामा नकार देण्याबाबतच केलेलं वक्तव्य करून स्वतःचं हसू करून घेतलं आहे, असं देखील उज्वल निकम यांनी म्हटलं आहे. ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला नाही तर यात राज्यपालांना हस्तक्षेप करावा लागू शकतो. राज्यपाल ममता बॅनर्जी यांचं मुख्यमंत्रीपद तसेच त्यांचे मंत्रिमंडळ बरखास्त करून बहुमतात विजयी झालेल्या भाजपला सत्ता स्थापनेसाठी आमंत्रण देऊ शकतात, असं उज्वल निकम म्हणाले.

सर्वोच्च न्यायालयात प्रकरण गेलं तर? उल्हास बापट म्हणाले... खूप गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, असं पुण्यातील ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उल्हास बापट यांनी ममता बॅनर्जींनी राजीनामा न देण्याच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे. ममता बॅनर्जी सत्ता गेली तर चांगलं झालं असते. त्याची दुसरी बाजू अशी आहे की सत्ताधारी पक्षाने नियम पाळले पाहिजेत. निवडणूक आयोगासंदर्भातील प्रश्न योग्य आहेत. कारणे घटनात्मक कायदे पाळणाऱ्या संस्था अंपायरसारख्या वागत नाहीत. ज्यावेळी विधानसभा विसर्जित झाली त्या दिवशी मुख्यमंत्रीपद रिक्त होते. बहुमत आलेल्या पक्षाचाच मुख्यमंत्री होईल. त्यामुळे उद्यापर्यंत ममता बॅनर्जींचं सरकार बहुमतात आहे. उद्यापासून त्याचा कार्यकाळ संपेल, असं बापट म्हणाले. तसेच हे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेलं तर, सुप्रीम कोर्ट ही अंतिम हस्तक्षेप करणारी संस्था आहे, मात्र त्याचा निकाल कधी लागेल माहिती नाही, असंही बापट म्हणाले.

...तर ममतांनी राजीनामा देण्याची गरज नाही- ॲड. विशाल गोसाई यांनी या घटनात्मक गुंतागुंतीबद्दल बोलताना थेट ७ मे च्या डेड लाईनचा उल्लेख केला आहे. 'नवनिर्वाचित सरकारचा शपथविधी झालेला नसला, तरी बंगालमध्ये आता सरकार बदलले आहे. १७ व्या बंगाल विधानसभेचा कार्यकाळ गुरुवार, ७ मे २०२६ रोजी संपुष्टात येत आहे. त्यानंतर ममता बॅनर्जी यांना अधिकृतपणे मुख्यमंत्री मानलेच जाणार नाही. कारण एका विधानसभेचा कार्यकाळ संपल्यानंतर नवीन मुख्यमंत्र्यांची निवड करणे बंधनकारक असते. त्यानुसार बंगाल विधानसभेचा कार्यकाळ संपल्यानंतर ८ मे रोजी राज्यपाल सभागृह विसर्जित करतील. त्यानंतर विद्यमान सर्व आमदारांचे सदस्यत्व आपोआप रद्द होईल, असं ॲड. विशाल गोसाई म्हणाले. तसेच पुढे बोलताना, त्यानंतर बॅनर्जी यांना राजीनामा देणेही बंधनकारक राहणार नाही,' असेही स्पष्ट केले.

## गोठ्याला लागली....

रेपेवाडी इथं ही घटना घडली आहे. रेपेवाडी येथील अशोक रामभाऊ रेपे यांच्या घराशेजारील कोठ्याला सायंकाळी ८ ते ९ वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. वाळलेला चारा आणि लाकडी साहित्यामुळे आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केले. आग लागली तेव्हा अशोक रेपे यांचे वडील रामभाऊ एकनाथ रेपे हे गोठ्यात होते. आगीच्या ज्वाळा इतक्या भीषण होत्या की, त्यांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. या आगीत होरपळून त्यांचा जागीच मृत्यू झाला. या आगीत केवळ जीवितहानीच नाही, तर रेपे कुटुंबाचे आर्थिक कंबरडंही मोडले आहे.

१० गायी, १५० कोंबड्या जळून खाक- प्राथमिक माहितीनुसार, या आगीत सुमारे १० गायी. १५ शेळ्या. १५० कोंबड्या जळून खाक झाल्या आहेत. कोठ्यात साठवून ठेवलेला चारा आणि इतर शेती उपयोगी साहित्यही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने धाव घेतली. पण, आगीची तीव्रता इतकी होती की, तोपर्यंत गोठ्याचं मोठं नुकसान झालं. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे शिवारामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

## हुंड्यासाठी महिला....

(रा. अहिल्यानगर, सध्या रा. कामोठा) यांच्याशी झाला होता. लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस चांगले गेल्यानंतर, पती अमित याने नवी मुंबईत घर घेण्यासाठी पैशांचा तगादा लावला. सासू-सासऱ्यांनीही यात साथ देत गौरी यांचा मानसिक छळ सुरू केला, तसेच त्यांचा नोकरीचा पगार आणि सोन्याचे दागिनेही बळजबरीने काढून घेतले. पतीचे अनैतिक संबंध आणि सासरच्यांकडून होणारी मारहाण यामुळे गौरी प्रचंड मानसिक तणावाखाली होत्या. २७ एप्रिल रोजी पतीने त्यांना सोडून निघून गेल्यानंतर आणि सासरच्यांनी संपर्क तोडल्यामुळे खचलेल्या गौरी यांनी अखेर टोकाचे पाऊल उचलले. याप्रकरणी पारनेर पोलिसांनी पती अमित, सासू संगीता आणि सासरे बाबासाहेब दळवी यांच्याविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे, मात्र आरोपी अद्याप मोकाट असल्याने परिसरातून संताप व्यक्त होत आहे.

## मृत्यूनंतरही नराधमाने...

चिमुकलीचा पोस्ट मॉर्टम रिपोर्ट सादर केला आहे. यामधून हादरवणारी माहिती समोर आलीये.

तोंडात बोळा कोंबून अत्याचार- ससून रुग्णालयाचा प्राथमिक अहवाल सादर समोर आला आहे. यामधून धक्कादायक माहिती समोर आली आहे. आरोपीने चिमुकलीच्या तोंडात बोळा कोंबून अत्याचार केल्याचं विच्छेदन अहवालात उघड झालं होतं. अशातच आता आणखी तपास केल्यानंतर अशी माहिती समोर आलीये, ज्यामुळे तुमच्याही तळपायाची आग मस्तकात जाईल.

चिमुकलीच्या छातीत जोरात बुक्की मारली अन्... तोंडाच पायमोजा कोंबल्याने चिमुकलीचा मृत्यू झाला होता. पण खरंच ती मेली का हे तपासण्यासाठी नराधमाने असं काही केलं की, कुणी सामान्य वृत्तीचा माणूस विचारही करणार नाही. नराधमाने तिचा मृत्यू झाल्याची खात्री करण्यासाठी आरोपीने तिच्या छातीत जोरात बुक्की मारल्याचंही वैद्यकीय अहवालात म्हटलं आहे.

चेहऱ्यावर ओरखड्यांच्या खुणा- चिमुकलीच्या तोंडात आरोपीने बोळा कोंबल्याचे आढळून आलं, तिचं नाक आणि तोंड दाबलं होतं. मुलीचे अंतर्गत अवयव (व्हीसेरा) हा प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील पुढील तपासणी करण्यासाठी पाठवले आहेत. त्याचा अहवाल आल्यावर ससूनकडून पोलिसांना अंतिम अहवाल दिला जाईल. चिमुकलीच्या चेहऱ्यावर ओरखड्यांच्या खुणा आहेत. तिच्या गुप्तांगालाही इजा झाल्याचे तपासणीद्वारे आढळून आले आहे, अशी माहिती देखील समोर आलीये. प्राथमिक अहवाल पोलिसांकडे सादर- चिमुकलीच्या बॉडीची मरणोत्तर तपासणी सरकारी रुग्णालय असलेल्या ससून रुग्णालयात झाली. त्यानंतर रुग्णालयाच्या न्यायवैद्यकशास्त्र विभागातील वैद्यकीय तज्ज्ञांनी मृतदेहाची 'इन कॅमेरा' उत्तरीय तपासणी केली आणि त्याचा प्राथमिक अहवाल पोलिसांकडे सादर केला होता. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. अशातच आता आरोपी कांबळेचा पाय आणखी खोलात गेला आहे.

## भरधाव कार लोखंडी ....

क्र.एम.एच.०३ बी.एच.८०२५ या गाडीच्या चालकाचा स्टेअरींगवरील ताबां सुटल्याने गाडी भरधाव वेगात लोखंडी अँगलला जावुन धडकली. या अपघातात कारमधील आदित्य दिलीप तुळवे (वय २२, रा.पेंडगाव ता.बीड) हे गंभीररित्या जखमी झाले. त्यांना तातडीने जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी मयत घोषीत केले. कारमध्ये अन्य दोघे होते. मात्र हे दोघेही पुढे असल्याने अपघात होताच एअरबॅग उघडल्याने दोघांचा जिव वाचला. घटनेची माहिती कळताच बीड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी भेट देवुन पाहणी केली.

◆ पान ४ वरून पुढे...

## मराठवाड्यात पेट्रोल....

देखील सांगण्यात आले आहे. जाणूनबुजून कृत्रिम टंचाई निर्माण करणार्या पेट्रोल पंपधारकांवर कठोर कारवाईचे निर्देश देण्यात यावे अशी मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे. त्याचबरोबर नांगरिकांना देखील सूचना दिल्या आहेत की नागरिकांनी अफवांना बळी न पडता नियमित पद्धतीने इंधन खरेदी करावे असे सांगण्यात आले आहे, याबाबत जनजागृती करावी. मागील काही दिवसांपासून सातत्याने इंधन ग्राहकांच्या मनामध्ये भिती निर्माण केली जात आहे. सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावणारी ही दरवाढ जनतेची आर्थिक लूट करणारी आहे, ती तात्काळ थांबवावी असे सांगण्यात आले आहे. सरकारच्या विरोधामध्ये बीड जिल्हा काँग्रेसने आज जिल्हाधिकारी साहेब बीड यांना या सर्व सामान्याच्या व्यथा कळवण्यासाठी जारी केले आहे.

## उमापूर उच्च....

प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा शिक्षण महर्षी मा.शिवाजीराव (दादा) पंडित, अध्यक्ष मा.अमरसिंह पंडित, सचिव मा.जयसिंह पंडित, मा. आ.विजयसिंह पंडित, युवा नेते पृथ्वीराजे पंडित, युवा नेते रणविर (काका) पंडित, प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर सर, गोगुले सर, हाटोटे सर, प्राचार्य भक्तराज पौळ सर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच गांवकरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मामा-मामी....

फिर्यादीनुसार, १३ मार्च ते १९ मार्च २०२६ या कालावधीत आणि त्याआधीही २ ते ३ महिन्यांपासून त्याने वारंवार पीडितेचे लैंगिक शोषण केले होते. आरोपीला इटकूरमधून अटक- आई-वडील शेतातून परतल्यानंतर पीडितेने घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर मामीने दिलेल्या फिर्यादीवरून युसूफवडगाव पोलिसांनी मंगळवारी रात्री आरोपीविरुद्ध पोक्सो आणि बलात्काराचा गुन्हा दाखल केला. गुन्ह्यानंतर आरोपी आपल्या गावी पळून गेला होता, मात्र पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे यांच्या पथकाने तांत्रिक तपास करून त्याला इटकूर येथून बेड्या ठोकल्या. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे, पोलीस कॉन्स्टेबल महेश कोकाटे आणि सोहेल पठाण यांनी पार पाडली. पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी महिला जमादार बेबी गांधले यांनी तिला अंबाजोगाई येथे नेले होते.

## भारतीय कम्युनिस्ट....

कॉम्रेड भाऊ प्रभाळे राज्य राज्य कौन्सिल सदस्य कॉम्रेड रंजना हुरकुडे किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड ज्योतीराम हुरकुडे यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमास ज्येष्ठविधीज्ञ हा कॉम्रेड भीमराव चव्हाण कॉ. तुकाराम पवार- ठाकूर, मुख्याध्यापक कॉम्रेड विनोद सवासे, लाडकी लेक अभियान चे जिल्हा समनव्ययक व एकल महिला संघटनेत कार्यरत सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे धम्मा देवडे आयुब खान पठाण अलीम इनामदार शकील फारुकी मोहन वायकर अखिल शेख सलीम शेख गणेश गाडे युसुफ शेख आबरा शेख बाळू गाडे यांच्यासह पुष्कळ कार्यकर्ते उपस्थित होते सभेचे संचालन जिल्हा सेक्रेटरी बहूप्रमाणे यांनी केले तर आभार किसान सभेचे जिल्हा सरचिटणीस कॉम्प्रेस ज्योतीराम मुरकुटे यांनी मांडले

## बीड जिल्ह्यातील....

भेगांमध्ये दुचाकीचे चाक अडकुन मागील ४ वर्षात अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी काटेरी बाभळी आल्याने वाहनधारकांना अडथळा येत आहे तर काही ठिकाणी दुभाजकाच्या आजुबाजुला मोठ्या प्रमाणात माती साचल्याने वाहने घसरून पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत. सामाजिक कार्यकर्ते यांनी लेखी तक्रारी केल्यानंतर दर्जेदार सिमेंट ब्लॉक कट करून दुरुस्ती करण्याऐवजी डांबरीकरण करून रस्त्याच्य भेगा थातुरमातुर बुजवण्यात येत असुन जिल्हा प्रशासनाचे याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचे बोलले जाते. रस्ते सुरक्षा समितीच्या अध्यक्ष आणि सचिवांच्या आदेशाला कंत्राटदारांकडून केराची टोपली - रस्ते सुरक्षासारख्या गंभीर विषयावर आयोजित केलेल्या बैठकीला व्हिडिओ कान्फरन्सद्वारे उपस्थित न राहिलेल्या सदस्यांबाबत जिल्हाधिका-यांनी तिव्र नाराजी व्यक्त करून कामात हलगर्जीपणा करणा-या संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असली तर रस्ते सुरक्षा समितीचे अध्यक्ष आणि सचिव यांच्या आदेशाला कंत्राटदारांकडून सुद्धा केराची टोपली दाखवली जाते. बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावर लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयासमोरील अपघात प्रवणक्षेत्राची दि.२६ जुन २०२५ रोजी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि रस्ता सुरक्षा समितीचे सचिव कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग रविंद्र तोंडे यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली होती.या अनुषंगाने दि.६ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने गतिरोधक बसविण्याबाबत लेखी आदेश काढले होते. ६ महिने उलटुनही अद्याप गतिरोधक बसविण्यात आले नसुन कंत्राटदाराने या आदेशाला केराची टोपली दाखवल्याचे दिसून येत आहे त्यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाचे अधिकारी आणि कंत्राटदार दोघांवरही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे.

## त्याग माणसाला....

महाराज आणि पुढे संत ज्ञानेश्वर महाराज आपल्याला लाभले. ज्ञानेश्वर माऊलींमुळे जीवनाची सार्थकता सांगणारा 'ज्ञानेश्वरी' सारखा महान ग्रंथ आपल्याला मिळाला. ज्ञानेश्वरी हे केवळ गीतेवरील भाष्य नसून, तो गीतेवरील एक अनुपम अलंकार आहे. माऊलींनी एका-एका शब्दावर शेकडो ओव्या लिहून समस्त मानवजातीला अमूल्य देणगी दिली आहे असेही उद्बोध महाराज म्हणाले. भक्तीमध्ये कायिक, वाचिक आणि मानसिक तपश्चर्या महत्त्वाची असल्याचे सांगत महाराजांनी 'विठ्ठल, विठ्ठला' हे भजन सादर केले. यावेळी उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात तल्लीन होऊन भजनाचा आनंद घेतला. तसेच 'नाम घ्यावे आवडीने, व्हावे पावन गुरुभक्तीने' या भजनाने संपूर्ण नाट्यगृह भक्तिमय झाले होते. कोणतेही चांगले काम करताना भगवंताचे नाव घेतल्यास त्या कामाला पूर्णत्व येते, अशी शिकवणही त्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमाला शहरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व.झुंबरलाल खटोड प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेल्या या आध्यात्मिक आयोजनाचे बीडकरांकडून कौतुक झाले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल :मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### जायकाकडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही ए'मेडिकल केअर सिस्टम' मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता 'स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम ण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे.

# लक्ष्मीकांत बेर्डे म्हणजे 'देवमाणूस'!

## महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम अभिनेता म्हणाला...

**मुंबई । प्रतिनिधी**




'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा शो प्रेक्षकांचा आवडता शो आहे. या शोमधील कलाकारांची विनोद, त्यांचे हावभाव सगळं काही प्रेक्षकांना आवडतं. याच शोमधून प्रभाकर मोरे हे घराघरात पोहचले. त्यांचा आता मोठा चाहतावर्ग आहे. त्यांनी आजवर अनेक मालिका, सिनेमांमध्ये काम केलय. दरम्यान अशातच एका मुलाखतीत प्रभाकर मोरे यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांची एक आठवण शेअर केली आहे.

काही दिवसापूर्वी प्रभाकर मोरे यांनी तारांगणला मुलाखत दिली. या मुलाखतीत बोलताना त्यांनी लक्ष्मीकांत यांच्या स्वभावाचं कौतूक केलं. ते म्हणाले की, '२००३ मध्ये लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. तेव्हा मी एका मालिकेत काम करत होते. त्या मालिकेत लक्ष्मीकांत क्लर्क म्हणून होते आणि मी शिपाई होतो. ती मालिका टीव्हीवर येयची होती. त्यावर मी पहिल्यांदा सेटवर त्यांना पाहून भारावून गेलो होतो. कारण लहानपणी त्यांना स्क्रीनवर पाहिलेलं. तेव्हा दिग्दर्शकांनी माझी आणि त्यांची ओळख करुन दिली.'

'वाचन झालं की, ते एकदम परफेक्ट कोकणातील भाषा बोलत होते. माझं वाचन एक-दोन वेळा ऐकून त्यांनी माझ्या पाहिलं आणि विचारलं, काय रे कुठला आहेस? त्यावर मी चिपळूनचा आहे असं म्हणालो... त्यावेळी ते लगेच म्हणाले, 'अरे माझ्या गावाचाच आहेस तर' त्यानंतर आम्ही चार दिवस खुप छान एकत्र काम केलं. परंतु ते एकदाही सुपरस्टारसारखं वागले नाही.' दरम्यान प्रभाकर मोरे यांच्याबद्दल बोलायचं झालं तर त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. कोकणचे पारसमणी अशी त्यांची ओळख आहे. महाराष्ट्राची हास्यजत्रा या शोमुळे त्यांना वेगळी ओळख मिळाली. प्रभाकर मोरे यांनी या शोसह अनेक सिनेमामध्ये काम केलय.

### धाराशिव ध्वजदिन निधी संकलनात राज्यात तिसरे ; उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान

**धाराशिव । प्रतिनिधी**

सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निमित्त निधी संकलनात उल्लेखनीय कामगिरी करत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.या उत्कृष्ट कार्याची दखल घेत पालकमंत्री श्री.प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते १ मे रोजी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वजदिन म्हणून पाळण्यात येतो.या निमित्ताने दरवर्षी ७ डिसेंबरपासून पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत निधी संकलन मोहीम राबविण्यात येते.

# विशेष सखोल पुनरिक्षण ; मतदार मॅपिंगचे काम दि.१० पर्यंत पुर्ण करण्याचे निर्देश

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात मतदार मॅपिंगच्या कामाला वेग आला आहे. येत्या दि.१० मे पर्यंत जिल्ह्यातील मॅपिंगचे काम पूर्ण करावे असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत. दरम्यान जिल्ह्यातील मॅपिंगच्या कामाला वेग आला असून बुधवार दि. ६ पर्यंत जिल्ह्यातील एकूण ३२,४४,२५८ मतदारांपैकी २४,१५,०३५ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून एकूण प्रगती ७४.४४ टक्क्यांवर पोहोचली आहे,अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सरिता चौधरी यांनी दिली आहे. जिल्हाधिकारी विनय गोडा यांनी संबंधित सर्व मतदार नोंदणी अधिकारी, विधानसभा मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) आणि सुपरवायझर यांना हे काम निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान, मॅपिंगदरम्यान काही मतदार त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर आढळून न आल्याचे तसेच काही मतदार मृत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकरणांमध्ये निवडणूक आयोगाच्या नियमानुसार संबंधित मतदारांना 'स्थलांतरित मतदार' व 'मृत मतदार' या वर्गवारीत समाविष्ट करून नावे वगळण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. SIR अंतर्गत मतदार मॅपिंग ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून त्यामुळे मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक होण्यास मदत होते. यामुळे पुनरावृत्ती टाळली जाते तसेच स्थलांतरित, मृत किंवा अनुपलब्ध मतदारांची नोंद व्यवस्थित ठेवता येते. परिणामी निवडणूक प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व निष्पक्ष बनते. या प्रक्रियेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) घरी भेट देत असताना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, तसेच जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध इञ्ज माहितीच्या आधारे संपर्क साधून स्वतःचा तपशील अद्ययावत करून मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रम प्रवेश ; दि.१० जून पर्यंत अर्ज मागविले

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेत हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रम बरगढ (ओडीशा) येथे शिकविला जातो. त्यासाठी महाराष्ट्र राज्यासाठी १३ + १ जागा आहेत. या अभ्यासक्रमासाठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, बाळासाहेब पवार सहकार भवन, तिसरा मजला, जाफर गेट, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत विहीत नमुन्यात दि.१० जून पर्यंत प्रवेश मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज विहित नमुन्यात प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग आयुक्तालय यांच्याकडे सादर करावे. प्रवेश अर्जाचा नमूना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे http.www.dirtexmah.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. अर्जाचा नमूना व प्रवेश प्रक्रियेची माहिती सर्व प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोउद्योग कार्यालयात उपलब्ध आहे,अशी माहिती वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने यांनी कळविले आहे.

# अनाथ आश्रमात खाऊ वाटप करुन संतोष रासवे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**



येथील पत्रकार संतोष रासवे तथा सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असलेले संतोष रासवे यांचा वाढदिवस अतिशय प्रेरणादायी आणि सामाजिक बांधिलकी जपत गेवराई येथील बालग्राम अनाथ आश्रमात खाऊ वाटप करून उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त आश्रमातील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले. सामान्यतः वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात; मात्र समाजातील गरजू आणि निराधार मुलांसोबत आनंद वाटून घेण्याचा संदेश संतोष रासवे यांनी आपल्या कृतीतून दिला. या उपक्रमामुळे सामाजिक जाणिवा जपण्याचा आणि समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याचा आदर्श निर्माण झाला आहे.

या प्रसंगी पत्रकार परमेश्वर सोळंके, बाळासाहेब आडागळे, प्रचंड सोळंके, महादेव आढाव यांच्यासह बालग्राम अनाथ आश्रमातील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी संतोष रासवे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, यश आणि सामाजिक कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. वाढदिवसाच्या निमित्ताने केलेल्या या सामाजिक उपक्रमामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, अशा उपक्रमातून समाजात माणुसकी आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### ग्रामीण भागासाठी आपले सरकार सेवा केंद्र प्राथमिक निवड, मुलाखत, शुध्दिपत्रक, मुलाखत वेळापत्रकाबाबत आवाहन


**नांदेड । प्रतिनिधी**

जिल्हा सेतू समिती नांदेड मार्फत जिल्हयातील ग्रामीण भागासाठी आपले सरकार सेवा केंद्र ग्रामपंचायत निहाय प्राथमिक निवड / मुलाखत / निरंक शुध्दिपत्रक यादी, जिल्हा नांदेड सोमवार ११ मे २०२६ रोजी https://nanded.gov.in/ https://setusamitinanded.in/ प्रसिध्द करण्यात येणार आहे.

तसेच मुलाखतीस पात्र ठरलेल्या अर्जदारांचे मुलाखत १५ मे व १६ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे घेण्याचे प्रस्तावित आहे. तालुकानिहाय मुलाखतीचे वेळापत्रक नांदेड जिल्हयाच्या संकेतस्थळावर सविस्तरपणे प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत कोणत्याही अर्जदारास वैयक्तिकरित्या स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही तसेच कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. त्यामुळे सर्व अर्जदारांनी https://nanded.gov.in/ हे संकेतस्थळ नियमितपणे पहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव सेतू समिती नांदेड यांनी केले आहे.

# मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम मतदान केंद्रांवर बीएलए नियुक्तीबाबत जिल्हाधिकारी यांचे राजकीय पक्षांना आवाहन

**परभणी । प्रतिनिधी**



राज्यात लवकरच होणाऱ्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने पूर्वतयारीला वेग दिला आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. बैठकीत प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नियुक्त करण्याबाबत तसेच मतदार याद्यांच्या पुनरिक्षण प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) लवकरच महाराष्ट्रात सुरु होण्याची शक्यता असल्याने मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्राप्त निर्देशाचे अनुषंगाने सध्या सुरु असलेल्या पूर्व तयारीच्या कामाची माहिती देण्यासाठी तसेच जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर राजकीय पक्षाचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नेमणुक करण्याबाबत व त्यांच्या कर्त्यव्याबाबत माहिती देण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी भारत निवडणुक आयोगच्या निर्देशानुसार राज्यामध्ये विधानसना मतदारसंघाच्या मतदारयाद्यांच्या आगामी विशेष सखोल पुनरिक्षणाच्या अनुषंगाने आयोगाच्या निर्देशानुसार पुर्वतयारी करण्यात येत आहे. त्यामध्ये सद्याच्या यादीतील मतदारांच्या नोंदवणीची सन २००२ मध्ये झालेल्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतर्गत तयार करण्यात आलेल्या मतदार यादीतील नोंदीशी जुळवणी करण्यात येत आहे. सदर पुर्वतयारी तसेच आगामी पुनरिक्षण कार्यक्रमात राजकीय पक्षाच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधीशी समन्वय असणे महत्त्वाचे असणार आहे. स्थानिक पातळीवरील मान्यता प्राप्त राजकीय पक्षांना मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नेमण्यात यावेत असे सांगीतले.

त्यांनी मतदार यादीचे आगामी विषेश सखोल पुनरिक्षण बाबत सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, यांनी बैठकीचा समारोप करताना सर्व राजकीय पक्षांना जिल्ह्यातील १६२३ मतदान केंद्रावर राजकीय पक्षाचे मतदान केंद्रस्तीय प्रतिनिधी (बीएलए) नेमण्याबाबतचे भारत निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार आगामी काळात होणा-या (SIR) च्या अनुषंगाने तात्काळ बीएलए नेमणुका करण्याबाबत आवाहन केले. तसेच बीएलओ यांच्या कामाचे महत्व सांगितले. सदर बैठकीस योगेश महाजन व नसिरोद्दीन सिद्धिकी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस), जाफर खान मुसाखान (BSP), अंकुश विष्णुपंत शेटे (मनविसे), संजय दौतराम रीझावाणी, ओंकार दुधाटे (भारतीय जनता पार्टी), नरेश नारायणराव येरळकर, कार्तिक देविदास पांडागळे व प्रविन कानडे (शिवसेना), शेख तल्हा व शेख हुसेन (आम आदमी पार्टी), लखन पवार (शिवसेना उ.बा.ठा), गंगाप्रसाद यादव व लखन चव्हाण (राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी शरद पवार), अनिल प्रल्हाद शिंदे व बाळासाहेब वामन शेजुळे (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) हे राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे हिवरा गडलिंग येथे महिला सक्षमीकरण अभियान संपन्न ; राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**




लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड' यांच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील हिवरा गडलिंग या गावी 'महिला सक्षमीकरण अभियान' मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनवण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

शाहू महाराजांनी कायमच स्त्री शिक्षण आणि महिलांच्या प्रगतीचा ध्यास घेतला होता. याच विचारांचा वारसा पुढे चालवत संस्थेने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी उपस्थितांना राजर्षी शाहू महाराजांनी महिलांच्या हक्कांविषयी आणि सक्षमीकरणाबद्दल मांडलेले पुरोगामी विचार सांगून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

महिलांसाठी विविध उद्योग व शासकीय सबसिडीबाबत मार्गदर्शन

या अभियानाचे प्रमुख आकर्षण म्हणजे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी देण्यात आलेले सविस्तर व्यावसायिक मार्गदर्शन. ग्रामीण भागातील महिला कमी भांडवलात स्वतःचा व्यवसाय कसा सुरू करू शकतात, याबाबत तज्ज्ञांनी खालीलप्रमाणे माहिती दिली:

शेतीपूरक व अन्नप्रक्रिया उद्योग: महिलांना गावातच राहून दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन यांसारखे व्यवसाय कसे करता येतील याची माहिती देण्यात आली. तसेच मसाला, पापड, लोणचे निर्मिती, फळप्रक्रिया आणि मिनी डाळ मिल यांसारख्या अन्नप्रक्रिया उद्योगांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले,हस्तकला व इतर व्यवसाय

कर्ज योजना आणि सबसिडी: केवळ उद्योग सुचवून न थांबता, त्यासाठी भांडवल कसे उभे करावे याचीही माहिती देण्यात आली. यामध्ये 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (उचएत्रझ)' आणि 'पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (झचएत्रझ)' अंतर्गत महिलांना मिळणाऱ्या ३५% पर्यंतच्या सबसिडी (अनुदान) बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, विनातारण कर्ज देणारी 'प्रधानमंत्री मुद्रा योजना', 'स्टँड अप इंडिया' आणि महिला बचत गटांसाठी असणाऱ्या 'उमेद अभियाना'ची (चडठङच्) माहिती महिलांना देण्यात आली.

व्यवसायासाठी आवश्यक असणारी उद्यम नोंदणी (णवूरा ठशसळीींरींळेप) आणि प्रकल्प अहवाल (झीक्षशलीं ठशिीीं) कसा तयार करावा, याबाबतही सोप्या भाषेत मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमाला मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव श्री. तेजस पवार, श्री. रोहन डोळस, श्री. सागर गवई यांच्यासह संस्थेचे इतर सदस्य आवर्जून उपस्थित होते. हिवरा गडलिंग गावातील महिला व ग्रामस्थांनी या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला आणि मोठ्या संख्येने उपस्थित राहून या बहुमूल्य मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

दैनिक
# मराठवाडा पत्र

▸▸ गुरूवार, दि. ०७ मे २०२६





बीड माजलगाव चे प्रतिनिधी श्री. संतोष रासवे यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयात शुभेच्छा देतांना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, प्रचंड सोळंके, परमेश्वर सोळंके, बाळासाहेब अडागळे, आदी छायाचित्रात दिसत आहेत.

# मराठवाड्यात पेट्रोल डिझेलचा तुटवडा !

## इंधन महागण्याच्या अफवांमध्ये किती तथ्य ? पंपावर रांगा

**बीड । प्रतिनिधी**

इंधनामध्ये वाढ होणार या कारणामुळे अनेक चालकांनी त्याच्या गाडीतील टँक फूल केले आणि त्यामुळे अनेक धक्कादायक प्रकार देखील समोर आले होते. अनेक कार, बाईक चालकांनी टँक फूल केल्यामुळे मराठवाड्यामधील आता पेट्रोलपंप कोरडेठाक पडले आहेत. अनेक पंपांवर इंधनासाठी गाड्यांच्या रागां लागलेल्या पाहायला मिळाल्या. त्याचबरोबर रांगा असूनही पेट्रोलपंप कोरडे असल्यामुळे कार आणि बाईंक रिकाम्या नेण्याची वेळ आली आहे. पेट्रोल पंपावर इंधनाअभावी उभी असलेली वाहनं आता मागे न्यावी लागत आहेत.




शेतात उभे असलेले ट्रॅक्टर्स आणि पेट्रोलपंपावर इंधनासाठी लागलेल्या रांगाची लाईन काही कमी होण्याचं नाव काही घेत नाही आहे. मराठवाड्यातील धाराशीव, परभणी, लातूर आणि हिंगोली जिल्ह्यात थोड्या फार फरकानं प्रत्येक शहरातल्या पेट्रोलपंपावर अशीच स्थिती होती. मराठवाड्यात गेल्या चार दिवसांत पेट्रोल-डिझेल महागणार अशी अफवा उठलीये. या अफवेमुळं लोकांनी पुन्हा पेट्रोल डिझेलचा साठा करायला सुरुवात केली आहे. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. पेट्रोलपंपांवरील पेट्रोल संपून गेलंय.

साहजिकच ज्या ठिकाणी पेट्रोल-डिझेल आहे तिथं रांगा दिसू लागल्यात. कामाच्या ठिकाणी वाहनं इंधनाअभावी बंद पडल्यानं लोकं कॅन घेऊन पंपावर आल्याचं चित्र होतं. बाटली किंवा कॅनमध्ये पेट्रोल डिझेल देता येत नाही. पण लोकं हातघाईला आल्यानं पेट्रोलपंप मालकांचा नाईलाज झाल्याची परिस्थिती आहे. इंधन भाववाढीची भीती त्यात इंधन टंचाई अशा दुहेरी कात्रीत ग्राहक सापडले आहेत. गेल्या चार दिवसांपासून अफवेमुळं निर्माण झालेली इंधनकोंडी कशी फोडायची असा प्रश्न इंधन पुरवठादार कंपन्यांना पडला आहे.

जिल्ह्यामधील मराठवाड्यातील सर्व पेट्रोल पंपांवर त्वरित पाहणी करावी अशी मागणी करण्यात आली आहे, त्याचबरोबर इंधनाच्या उपलब्धतेचा अहवाल द्यावा असे

▸▸ उर्वरित पान २ वर

# उमापूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

## कु.हर्षदा पोपळघट प्रथम सृष्टी औटी द्वितीय तर श्रुती राजापूरकर तृतीय

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परिक्षेत उमापूर येथील उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी घवघवीत यश मिळवून यशाची परंपरा कायम राखली आहे. जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित उच्च माध्यमिक विद्यालय, उमापुर या विद्यालयाचा इयत्ता बारावी (विज्ञान) शाखेचा १०० टक्के




निकाल लागला असून विज्ञान शाखेची कु.पोपळघट हर्षदा गणेश ८९.६७ % टक्के गुण घेवून सर्वप्रथम तर द्वितीय - कु.औटी सृष्टी अजय ८७.३३%, तृतीय-कु.राजापूरकर श्रुती अमोल ८६.५०% टक्के गुण मिळवून मुलींनी बाजी मारली आहे. या यशाबद्दल त्यांचे व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जगदंबा शिक्षण

▸▸ उर्वरित पान २ वर



पश्चिम बंगाल, आसाम आणि पुडूचेरी येथे भाजप ची बहुमताने सत्ता आली. त्यानिमित्ताने जिल्हा भाजप च्या वतीने आम्ही आनंद उत्सव साजरा केला आणि माजी मंत्री मा. बदाम आबा पंडित यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. या प्रसंगी माजी मंत्री मा. बदाम आबा पंडित, जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख, ॲड. सर्जेराव तात्या तांदळे, माधव तात्या निर्मळ, युवा नेते योगेश भैय्या क्षीरसागर, नवनाथ आण्णा शिराळे, शिवराज भैय्या पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाच्याने विश्वासघात केला

## मामा-मामी शेतात जाताच 10 वर्षीय मुलीवर अत्याचार

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील एका ग्रामीण भागात नात्यातील विश्वासाला तडा देणारी घटना घडली आहे. सोमवारी (४ मे) धाराशिव जिल्ह्यातील इटकूर (ता. कळंब) येथील २९ वर्षीय युवक आपल्या मामा-मामीला भेटण्यासाठी त्यांच्या गावी आला होता. रात्रीच्या वेळी मामा आणि




मामी शेतात पिकाला पाणी देण्यासाठी गेले असता, घरी १० वर्षे १० महिने १८ दिवस वय असलेल्या अल्पवयीन मुलीला या भाच्यासोबत ठेवण्यात आले होते.

पाच महिन्यांपासून सुरू होते शोषण- घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेऊन या नराधमाने चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केला. विशेष म्हणजे, हा आरोपी केवळ एकदाच नाही तर गेल्या पाच महिन्यांपासून अशा प्रकारच्या गैरकृत्यात गुंतलेला होता.

▸▸ उर्वरित पान २ वर

# भारतीय कम्युनिस्ट पक्ष बीड जिल्हा कौन्सिलच्या वतीने कार्ल मार्क्सच्या जयंतीदिनी क्रांतिकारी अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

जगातील कामगारांनो एक व्हा या क्रांतिकारी घोषणेने एकोणिसाव्या शतकात जगभर भांडवलदारी वर्गाला हादरून टाकणाऱ्या कार्ल मार्क्स च्या साम्यवादी कृतिशील तत्त्वज्ञानाने क्रांती घडवून आणली त्या कार्ल मार्क्सचा जयंतीचे औचित्य साधून दिनांक ५ मे २६ रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष जिल्हा कौन्सिल बीड येथे पक्ष व समविचारी सामाजिक कार्यकर्त्यांनी क्रांतिकारी अभिवादन केले असल्याची माहिती पक्षाचे प्रसिद्धी प्रमुख कॉ तुकाराम पवार यांनी दिली आहे. प्रथम कार्ल मार्क्स यांच्या




प्रतिमेस महाराष्ट्र राज्य सचिव मंडळ सदस्य कॉम्रेड नामदेव चव्हाण व संपादक कॉम्रेड शेखर कुमार यांनी पुष्पहार अर्पण केला यावेळी उपस्थितीना मार्गदर्शन करताना कॉम्रेड नामदेव चव्हाण यांनी कम्युनिस्ट पक्ष केवळ एक पक्ष नसून तो एक विचार आहे जोपर्यंत जगात गरिबी दारिद्र्य भेदभाव शोषित शोषक वर्ग अस्तित्वात आहे तोपर्यंत सत्तेत असो वा नसो कम्युनिस्ट पक्षाचअस्तित्व असणार ज्यांच्यावर अन्याय होतो ज्यांची पिळवणूक होते त्यांना कम्युनिस्ट पक्षाशिवाय दुसरा पर्याय नाही हे अधोरेखित करून सांगितले तसेच कार्ल मार्क्सची आर्थिक परिस्थिती दयनीय असतानाही देखील नाही रे वर्गासाठी अतुलनीय विचारवंत म्हणून त्यांनी केलेले लेखन कार्य अमोल आहे.

संपादक कॉम्रेड शेखर कुमार यांनी दास कॅपिटल या ग्रंथाचे वाचन व अभ्यास करण्याचे आवर्जून सुचविले आहे कॉम्रेड रंजना उरकुडे प्रसंगोचित मनोगत व्यक्त केले महाराष्ट्र राज्य किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य कॉम्रेड डीजे तांदळे यांच्या अध्यक्षतेखाली व पक्षाचे जिल्हा सरचिटणीस

▸▸ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावरील भेगा मिटेना अन् जिल्हा प्रशासनाची टीर बडवण्याची हौस काही फिटेना

### राष्ट्रीय महामार्ग बनले मृत्युचे सापळे : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाला जागोजागी मोठ्या भेगा पडलेल्या असुन या भेगांमध्ये दुचाकी वाहने अडकुन झालेल्या अपघातांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असुन अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे तर अनेकांना अपंगत्व आले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांकडून दर्जेदार दुरूस्तीसाठी वांरवार निवेदने, आंदोलनाद्वारे पाठपुरावा



करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएससीआरडी आणि जिल्हा प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत नसतानाच बीड जिल्हा प्रशासन मात्र जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या नावाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या बैठकीत जिल्ह्यातील रस्ते अपघातातील मृत्युंच्या प्रमाणात ३३ टक्क्यांची लक्षणीय घट झाली असुन या प्रभावी कामगिरीमुळे महाराष्ट्र राज्यात बीड जिल्हा रस्ते सुरक्षेच्या बाबतीत दुसरा क्रमांक पटकावला असल्याची माहिती देत स्वत:ची टीर बडवुन घेताना दिसत असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबाणेशकर यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यातुन जाणारे खामगाव ते पंढरपूर, अहमदपूर ते अहिल्यानगर, पैठण ते पंढरपुर आदी राष्ट्रीय महामार्गांवर मोठमोठ्या भेगा पडलेल्या असुन

▸▸ उर्वरित पान २ वर

# त्याग माणसाला जीवनाचे खरे सार लक्षात आणून देतो - वेदविभूषण उद्बोध महाराज




**बीड । प्रतिनिधी**

जीवनात मनुष्याची वृत्ती बदलली की त्याला कशाचीही आसक्ती राहत नाही. त्याग हा माणसाला जीवनाचे खरे सार लक्षात आणून देतो. ज्याचा भाव शुद्ध असतो, त्याच्याकडूनच खरी भगवंत भक्ती घडते, असे प्रतिपादन वेदविभूषण उद्बोध महाराज (श्री संत नरहरीनाथ महाराज संस्थान, देऊळगावराजा) यांनी येथे केले.

शहरातील स्व.झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित 'श्री नवनाथ कथासार' या संगीतमय कथेच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी (दि. ६) विचारपुष्प गुंफताना ते बोलत होते. प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड यांच्या हस्ते महाराजांचे पुष्पहार अर्पण करून जंगी स्वागत करण्यात आले.

गुरू परंपरेवर प्रकाश टाकताना उद्बोध महाराज म्हणाले, ज्यांना न कळता सारे काही कळते त्यांना 'सद्गुरु' म्हणावे. ज्याला सांगून कळते तो 'मित्र' आणि ज्याला सांगूनही कळत नाही त्याला 'शत्रू' समजावे. आपल्याकडे गुरूंची परंपरा अविरत सुरू आहे. वारकरी संप्रदाय आजही ताकदीने पुढे जात आहे, कारण वारकरी विचार आपल्या रक्तात भिनलेला आहे. चांगला शिष्य मिळणे हे गुरू परंपरेसाठी अभिमानास्पद असते, कारण अशा शिष्यामुळेच ही ज्ञानपरंपरा पिढ्यानपिढ्या प्रवाहित राहते. कथेच्या ओघात उद्बोध महाराजांनी गहिनीनाथ महाराजांच्या कार्याचे स्मरण केले. ते म्हणाले, गहिनीनाथ महाराजांचे महाराष्ट्र भूमीवर प्रचंड उपकार आहेत. त्यांच्यामुळेच निवृत्तीनाथ

▸▸ उर्वरित पान २ वर

# 'चक्री'जुगारावर पोलिसांचा छापा

## 30 हजारांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली. राजीव नगर परिसरात एका गाळ्यात सुरू असलेल्या 'चक्री' जुगारावर छापा टाकून रोख रक्कम व साहित्य असा ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शहरात गेल्या काही महिन्यांपासून शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत गुटखा,



मटका, पत्त्यांचे क्लब, अवैध दारू यांसारखे धंदे वाढल्याचे चित्र असून, याकडे शिवाजीनगर पोलिसांच्या कारवाया थंडावल्याचे दिसत आहे.स्थानिक पोलीस दुर्लक्ष करत असल्याची चर्चा आहे. दरम्यान,राजीव नगर भागात एका गाळ्यात चक्री जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ छापा टाकला. हा गाळा सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांचा असल्याची देखील चर्चा आहे. या कारवाईत रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले.एकाला ताब्यात घेण्यात आला असून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक श्रीराम खटावकर तसेच कर्मचारी राहुल शिंदे, आनंद मस्के, राख मेजर यांनी केली.